# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/02/2024 (सोमवार) दुपार

---

### गांजा बाळगणारे आरोपीतांविरूद्ध पोस्टे खापरखेडा नागपुर ग्रामिणची कारवाई :—

पोस्टे खापरखेडा अंतर्गत चनकापूर हनूमान मंदीर जवळ पोस्टे खापरखेडा येथील स्टाफ अवैध धंद्यांवर आळा घालणे संबंधाने पेट्रोलिंग करीत असताना पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीतील चनकापूर हनूमान मंदीर जवळ **आरोपी नामे— १) शैलेश रामलाल सूर्यवंशी वय ४५ वर्ष वार्ड क्रमांक दोन चणकापूर २) सयबाण सुफुरुल्ला सलमानी वय ३६ वर्ष रा. वॉर्ड क्रमांक दोन चणकापूर ३) गुलाब सुखबहादुर थापा, वय ३६ वर्षे रा. वार्ड क्रमांक २ चण**कापूर **४) निखिल ओमप्रकाश खांडेकर वय ४५ वर्ष रा. चनकापुर ५) विश्वजीत माणीकराव चव्हाण, वय २५ वर्ष रा. वार्ड नं. ४ खापरखेडा** हे मादक पदार्थ गांजा हे सेवन करून चिमलेल्या अवस्थेत मिळून आल्याने त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचे ताब्यातून मादक पदार्थ पिण्याकरता लागणारा मातीची अर्धवट जळालेली १ काळया रंगाची त्यामध्ये भुरकट रंगाची राख असलेली व एक लाल पिवळया रंगाचा लहान कापड तसेच एक चावी छाप माचिसची डबी असे मादक पदार्थ पिण्याचे साहित्य मिळून आल्याने सदर आरोपींविरूद्ध पोस्टे खापरखेडा येथे कलम २७, २९ एन. डी. पी. एस. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. यातीले आरोपी क्र. १) ते ५) यांना सुचनापत्रावर सोडण्यात आले आहे.

### घरफोडी

पो.स्टे. कळमेश्वर :— अंतर्गत १७ कि. मी. अंतरावरील मौजा ब्राम्हणवाडा ता. जि. नागपूर (ग्रामीण) येथे दिनांक ०३/०२/२०२४ चे २१.३० वा. ते दिनांक ०४/०२/२०२४ चे ११.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— श्री. मिलींद प्रदीप डहाके, वय ३६ वर्षे, रा. शिक्षक कॉलनी, ब्राम्हणी हे मौजा ब्राम्हणवाडा ता. नागपुर ग्रामीण येथे ईरा इंटरनॅशनल नावाचे नर्सरी व वर्ग ०१ ते ०७ पर्यंत शाळा चालवीत असुन दिनांक ०३/०२/२०२४ चे २१/३० वा. ते दिनांक ०४/०२/२०२४ चे ११/३० वा. च्या दरम्यान शाळा बंद असतांना कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी शाळेच्या गेटचा लॉक तोडुन पुढील प्रमाणे मुद्देमाल चोरुन नेला. १) ऑफीस बॉस चेअर नग ०२ किंमती १५,०००/— रू. २) म्यूजिक सिस्टम नग १ किंमती २५००/— रू. ३) सिलींग फॅन नग १४ किंमती १२,०००/— रू. ४) ईलेक्ट्रीक बोर्ड नग १६ किंमती १०००/— रू. ५) डिव्हीआर सोबत १३ कॅमेरे किंमती ३७,०००/— रू. ६) पितळी समई नग ४ किंमती ८,०००/— रू. ७) तांबा गंगाळ नग १ किंमती ९००/— रू. ८) विद्यार्थी फायबर खूर्ची नग ८६ किंमती १३,०००/— रू. ९) लाकडी टेबल नग ३ किंमती २२००/— रू. १०) झेब्रानिक्स कंपनीचे १० नग कॉम्प्यूटर किंमती १,८०,०००/— रू. ११) डेक्स बेंच नग ५६ किंमती ६५,०००/— रू. १२) सर्विस केबल वायर १०० फूट किंमती १,०००/— रू. १३) गार्डन पाईप बंडल (१ इंच) १ नग किंमती ७५०/— रू. १४) पोडीअम (डायस) १ नग ५,०००/— रू. १५) ग्रास कटर मशिन बॅटरीसह किंमती ३,०००/— रू. १६) वॉटर फिल्टर कुलर किंमती ५५,०००/— रू. १७) दोन हॉर्स पॉवरची मोटार १ नग किंमती ३७००/— रू. १८) स्पोर्ट सामान १४,०००/— रू. १९) इंटरनेट राउटर सोबत किंमती ३५००/—रू. आणि यूपीएस किंमती ३२००/— रू. असा एकूण ४,२५,७५०/— रू. चा मुद्देमाल तसेच विद्यार्थ्यांचे कागदपत्र, स्टाफचे कागदपत्रे, ऑफीस सामान, स्कूल स्टॅम्प, शाळेचे नावाचा गोल

दोन सिक्के व किचनचे सामान इत्यादी कोणीतरी अज्ञात चोराने शाळेचे व वर्गाचे कुलूप तोडून आत प्रवेश करून चोरून नेले. तसेच अज्ञात चोरांनी शाळेतील वर्गातील ईलेक्ट्रीक वायरींग व ईतर सामानांची तोडफोड करून नुकसान केलेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८०, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर, पोलीस निरीक्षक कळमेश्वर यांनी भेट दिली असुन अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. त्रिपाठी पो.स्टे. कळमेश्वर मो. क्र. ९८२३२०७२९७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**